# राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे
## जुनी मध्यवर्ती इमारत, तळ मजला, पुणे-४११००१

फोन नं.(०२०) २६०५०६४१ ई-मेल आयडी :- sceapune@gmail.com


**निवडणूक महत्वाचे**

३८६४ जा.क्र.रासनिप्रा/अभिलेख धारीका १३०/ क वर्ग संस्था तपासणी/ /२०१७
दिनांक : १७/०७/२०१७.

प्रति,
जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी तथा
उपनिबंधक, सहकारी संस्था (सर्व).

जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी तथा
विभागीय उपनिबंधक, सहकारी संस्था (दुग्ध) सर्व.

**विषय :- तालुका सहकारी निवडणूक अधिकारी यांचे स्तरावरील "क" वर्गातील सहकारी संस्थांच्या निवडणूक कामकाजाच्या तपासणी बाबत.**

**संदर्भ** :- १.महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ (कब).
२.महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणूक) नियम २०१४.

उपरोक्त विषयास अनुसरून सूचीत करणेत येते की,

२/- महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ (क) (ब) मधील तरतूदीनुसार राज्यातील सहकारी संस्थांच्या निवडणूकांचे अधिक्षण, संचालन व नियंत्रण यांची जबाबदारी राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणवर सोपविली आहे.

३/- महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार व दिनांक १२/०९/२०१४ रोजी महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणूक) नियम २०१४ हे दिनांक ११/०९/२०१४ पासून लागू झाल्याची अधिसूचना प्रसिद्ध झाली असून त्या दिवसापासून निवडणूक नियम लागू झालेले आहेत.

४/- **"क"** वर्गातील संस्थांच्या निवडणूक प्रकिये बाबत निवडणूक निर्णय अधिकारी नियुक्ती पासूनचे सर्व अधिकार उक्त नियमातील नियम ७५ नुसार तालुका सहकारी निवडणूक अधिकारी यांना आहेत. सदर संस्थांच्या निवडणूका नियमातील तरतूदी प्रमाणे पार पाडल्या जात आहेत किंवा कसे ? याची माहिती घेणे, पाहणी करणे याबाबत प्राधिकरणावर आवश्यक मनुष्य बळा अभावी मर्यादा येत आहेत. काही प्रकरणात निवडणूक प्रक्रिया कायद्यातील तरतूदी प्रमाणे समितीची मुदत संपण्यापूर्वी पार पाडल्या जात नाहीत, त्याची माहिती प्राधिकरणाकडे विहीत कालावधीमध्ये सादर केली जात नाही निवडणूक निधी हिशोब विहीत कालावधी पूर्ण करून संस्थेस उर्वरीत निधी लागलीच परत करणे, मुदतीत पदाधिकारी निवड केली जात नाही असे प्राधिकरणाचे निदर्शनास आलेले आहे.

५/- नियम ७५ प्रमाणे **"क"** वर्गातील संस्थेचे प्रत्यक्ष कामकाज तालुका सहकारी निवडणूक अधिकारी यांचे असले तरी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व कलम ७३ कब नुसार सर्व संस्थांचे निवडणूक संचालन, नियंत्रण प्राधिकरणाचे असून तालुका सहकारी निवडणूक अधिकारी यांना सदरचे काम हे निवडणूक नियम ०२ (१०) प्रमाणे जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी यांचे नियंत्रण व देखरेखी खाली मुदतीत निवडणूक कामकाज पार पाडायचे आहे. या बाबीकडे सर्व जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी व तालुका सहकारी निवडणूक अधिकारी यांचे लक्ष गांभिर्याने वेधणेत येत आहे.

६/- सबब, तालुका सहकारी निवडणूक अधिकारी यांचे स्तरावरील **"क"** वर्गातील संस्थांच्या निवडणूकीच्या कामकाजाची तपासणीचे काम आवश्यकते प्रमाणे राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणातील अधिकाऱ्यांबरोबरच संबंधीत जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी यांचेकडे सोपविण्यात येत आहे. त्यांनी दरमहा आपले अधिनस्थ असलेल्या किमान ०२ तालुका सहकारी निवडणूक अधिकारी यांचे **"क"** वर्गातील संस्थांच्या निवडणूक कामकाजाची तपासणी करून त्याचा अहवाल तपासणी केलेल्या दिनांकापासून १० दिवसांचे आंत प्राधिकरणास विहित केलेल्या नमुन्यात आपले शेरे व अभिप्रायासह सादर करावयाचा आहे. याबाबत दरमहा मासिक आढावा सभेत आढावा घेणेत येणार आहे याचीही नोंद घ्यावी.

**मा.आयुक्त, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, पुणे यांच्या आदेशानुसार.**

१७/७/१७

(यशवंत गिरी)
सचिव
राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

**सोबत** :-विहित तपासणी नमुना

**प्रत** :- तालुका सहकारी निवडणूक अधिकारी (सर्व)
यांना सूचीत करणेत येते की, उपरोक्त प्रमाणे कार्यवाही अनुषंगाने माहिती, रेकॉर्ड उपलब्ध करून देणेच आहे.

**माहितीस्तव** :-
जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी तथा विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था (सर्व).

# राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे

## जुनी मध्यवर्ती इमारत, तळ मजला, पुणे-४११००१

फोन नं.(०२०) २६०५०६४१/२६०५१११० ई-मेल आयडी :-sceapune@gmail.com



**तालुका सहकारी निवडणूक अधिकारी यांचे स्तरावरील " क " वर्गातील सहकारी संस्थांच्या निवडणूकविषयक कामकाजाच्या तपासणीबाबतचा नमुना**

- **कार्यालयाचे नाव** — ---------------------------------------------------------------------
- **तालुका सहकारी निवडणूक अधिका-यांचे नाव** — ----------------------------------------
- **तपासणी कालावधी — दि.------------------ पासून दि.---------------- पर्यंत**
- **मागील तपासणीचा दिनांक व तपासणी अधिकारी यांचे नाव व पदनाम** - ------------------------------
  ---------------------------------------------------------------------------------------------

| अ.क्र. | तपशील | अभिप्राय |
|---|---|---|
| | **- तालुक्यातील सहकारी संस्थांविषयक माहिती -** | |
| १ | निवडणूक अपेंडिक्सप्रमाणे तालुक्यातील नियम ४ प्रमाणे सहकारी संस्थांची विगतवारी - | अ \| ब \| क \| ड \| एकूण |
| २ | तालुक्याच्या ॲपेंडिक्सप्रमाणे क वर्गातील संस्थांची संख्या जुळते काय - | |
| ३ | नियम ५ नुसार नोंदवही ठेवण्यात आलेली आहे काय - | |
| ४ | असल्यास अदयावत नोंदी ठेवलेल्या आहेत काय - | |
| | **- सहकारी संस्थांच्या निवडणूकविषयक बाबी -** | |
| ५ | तालुक्यातील क वर्गातील सहकारी संस्था निवडणूकीची टप्पानिहाय सदयस्थिती - | |
| ६ | निवडणूकांचे महिनानिहाय कॅलेंडर करून त्याचे तंतोतंत पालन करण्यात येते काय - | |
| ७ | क वर्गातील प्रलंबीत निवडणूकांबाबतची कारणांसह सदयस्थिती - | |
| ८ | प्रलंबीत निवडणूका पार पाडण्याकरीता कालबध्द कृती कार्यक्रम तयार करण्यात येतो काय - | |
| ९ | नियमानुसार १८० दिवस अगोदर पात्र सहकारी संस्थांच्या मतदार यादया व निवडणूक निधी प्राप्त होतो काय - | |
| १० | प्राप्त मतदार यादया, निवडणूक नियम, प्राधिकरणाचे परिपत्रकीय निर्देश व मार्गदर्शक सूचनांनुसार मुदतीत निवडणूक प्रक्रिया चालू होतात काय ? | |
| ११ | मुदतीमध्ये मतदार यादया व निवडणूक निधी अप्राप्त प्रकरणात करण्यात येत असलेली कार्यवाही - | |
| १२ | मंजूर व अदा निवडणूकनिधी व्यतिरिक्त निर्वाचन अधिकारी परस्पर संस्थांकडून विनापूर्वमान्यतेने निधीची उचल करतात काय — असल्यास तपशील नमूद करावा. | |
| | **निर्वाचन अधिकारी नेमणूकीविषयक बाबी -** | |
| १३ | प्राधीकरणाचे मार्गदर्शक सुचना, स्थायी आदेश व परिपत्रकीय | |

| | | |
|---|---|---|
| | सूचना आणि निवडणूक नियमानुसार निवडणूक निर्णय अधिका-यांची नेमणूक करण्यात येते काय - | |
| १४ | निर्वाचन अधिकारी प्रशिक्षीत असल्याबाबतची खात्री करण्यात येते काय - | |
| १५ | निवडणूक कार्यक्रमास ता स नि अ यांचेकडून रितसर पूर्व परवानगी देण्यात येते काय - | |
| १६ | निवडणूक कार्यक्रम प्रसिध्दीबाबतची कार्यपध्दती काय आहे | |
| | **निवडणूकविषयक कामकाजाच्या बाबी -** | |
| १७ | नियम २० ते ७४ मधील तरतूदींचे टप्पे योग्य रितीने पार पाडले जातात काय | |
| १८ | निवडणूकीतील अधिसूचना व निकालपत्र नियमातील तरतुदीनुसार प्रसिध्द करण्यात येतात काय - | |
| १९ | निवडणूकीमध्ये उमेदवारांना निवडणूक खर्च व आचार संहितेची माहिती देण्यात येते काय - | |
| २० | निवडणूक नियम ७७ नुसार पदाधिकारी निवड विहीत मुदतीत घेण्यात आलेली आहे काय ? | |
| | **न्यायालयीन प्रकरणे व तक्रारीविषयक बाबी -** | |
| १० | मा उच्च न्यायालय / सहकार न्यायालय / सहकार अपील न्यायालय येथे निवडणूक विषयक दावे प्रलंबीत आहेत काय — असल्यास तपशील दयावा. | |
| २२ | निवडणूकीविषयी न्यायालयाने आदेश पारीत केलेले आहेत काय — असल्यास संक्षिप्त तपशील नमूद करावा. | |
| २३ | असल्यास त्याचे विहीत कालमर्यादेत पालन करण्यात आलेले आहे काय - | |
| २४ | निवडणूकविषयक व आचारसंहिता अंमलबजावणीबाबत स्वतंत्र कक्ष कार्यान्वीत करण्यात आलेला आहे काय - | |
| २५ | आचार संहिता भंगाबाबत तक्रारी प्राप्त होतात काय . तसेच प्राप्त तक्रारीवर वेळीच कारवाई करण्यात येते काय - | |
| २६ | निवडणूकींबाबत प्राप्त तक्रारींवर वेळीच चौकशी करून उचित कार्यवाही / कारवाई करण्यात येते काय. | |
| | **- उमेदवार निवडणूक खर्चविषयक बाबी -** | |
| २७ | निवडणूकीतील उमेदवारांचा निवडणूक खर्च वेळेत सादर होतो काय - | |
| २८ | उमेदवारांनी खर्चाच्या मर्यादेचे उल्लंघन केलेले आहे काय ? | |
| २९ | मुदतीत खर्च सादर न करणा-या उमेदवारांवर करण्यात आलेल्या कारवाईचा तपशील दयावा. | |
| | **- निवडणूक निधी हिशोब -** | |
| ३० | निर्वाचन अधिकारी यांना निधी रेखांकीत धनादेशाव्दारे देण्यात येतो काय ? | |
| ३१ | धनादेश देताना ते अरेखांकीत किंवा सेल्फ पध्दतीने काढण्यात येतात काय ? | |
| ३२ | तपासणी कालावधीत निधीचा वापर अयोग्य पध्दतीने झाल्याबाबत तक्रारी प्राप्त आहेत काय ? असल्यास त्यावर | |

| | | |
|---|---|---|
| | करण्यात आलेल्या कार्यवाहीबाबत तपशील देण्यात यावा. | |
| ३३ | निर्वाचन अधिकारी हे निवडणूकीचा खर्च विहीत मुदती मध्ये सादर करतात काय - | |
| ३४ | सादर केलेले खर्च हे प्राधिकरणाच्या परिपत्रकीय सूचनां प्रमाणे तपासण्यात येतात काय - | |
| ३५ | निवडणूकीपासून दोन महिन्यात खर्च मंजूरीबाबतची कार्यवाही पूर्ण करण्यात येते काय - | |
| ३६ | परिपत्रकीय सूचनेपेक्षा जादा झालेल्या खर्चास मान्यता मिळणेबाबतचे प्रस्ताव प्राधीकरणास वेळीच सादर करण्यात येतात काय - | |
| ३७ | निवडणूक खर्च मंजूरीनंतर संस्थेस तात्काळ उर्वरित शिल्लक रकमा अदा करण्यात येतात काय ? रकमा मिळाल्याबाबत संबंधीतांची स्वाक्षरी घेण्यात येते काय ? | |
| | **उमेदवारांच्या अनामत रकमांविषयक बाबी -** | |
| ३८ | उमेदवारांच्या अनामत रकमा निवडणूक निधी म्हणून निर्वाचन अधिका-यांकडून वापरण्यात येतात काय - | |
| ३९ | उमेदवारांच्या अनामत रकमा वेळेत परत करण्यात येतात काय. | |
| ४० | परत केल्याबाबतच्या नोंदी व स्वाक्षरी घेण्यात येते काय. | |
| ४१ | उमेदवाराची जप्त अनामत रक्कम प्राधिकरणाचे बँक खात्यावर वेळीच भरणा करण्यात येते काय - | |
| | **निवडणूक निधीविषयक नोंदी व कामकाज -** | |
| ४२ | निवडणूक निधी खात्यातील रकमांचा बॅक खात्यावरील शिल्लक रकमांशी ताळमेळ घेण्यात येतो काय . | |
| ४३ | निवडणूक खर्चाबाबत बाबवार खतावणी ठेवण्यात येते काय | |
| ४४ | निवडणूक निधीबाबत जमा व खर्चाच्या नोंदी स्वतंत्र रोकड वहीमध्ये अदयावत ठेवण्यात येते काय | |
| ४५ | जमा व खर्चाच्या नोंदी करणा-याच्या व ता स नि अ यांच्या तपासल्याबाबतच्या सहया घेण्यात येतात काय. | |
| ४६ | निवडणूक निधीपैकी उर्वरित शिल्लक निधी संस्थेस परत केल्याबाबतच्या नोंदी रोकड वहीमध्ये घेण्यात येते काय | |
| ४७ | निधी हिशोब पूर्ण झालेल्या संस्थांची नमुना १ ते ३१ माहिती प्राधिकरणास सादर केली आहे काय ? (क व ड वर्ग संस्था) | |
| **सामान्य शेरे व सूचना -** | | |
| | | |
| | | |
| | | |

**दिनांक —** **(तपासणी अधिका-याचे नाव,पदनाम व स्वाक्षरी)**

**स्थळ -**